# भूमिका

डॉ. यू.म. पठाण यांच्या कथालेखनात आज अखेर प्रबंधिकेला सुचलेला विषय कारण तो विषयही दलित राहिला. सर्व जाती धर्मातील दलितांबद्दल अनेक लेखकांनी लिहिले पण जिव्हाळ्यानं आणि आपुलकीने लिहिलेल्या डॉ. यू. म. पठाण यांनी लिहिलेले 'जितराब' आणि 'हवेली' हे कथासंग्रह बुध्दिजीवी आणि दलितांची कणव असलेले मार्गदर्शक डॉ. कुंदप सर यांच्या चर्चेतून पुढे आलेला विषय मुस्लिम दलितसदृश हाच माझ्या एम्.फिल. प्रबंधिकेचा विषय निवडण्यात दलितांच्या उध्दारासाठी केलेल्या धडपडीत माझा खारीचा वाटा म्हणून त्याच्या विषयी लिहिण्याची प्रेरणा मिळाली. डॉ. यू.म. पठाण यांच्या आर्त हाकेला डॉ. कुंदप सरांनी दिलेला प्रतिसाद माझ्या मनाला भुरळ घालून गेला आणि आपणही आपल्या लेखणीव्दारे त्याला साद घालण्याचा प्रयत्न अनेकांच्या आशीर्वादाने आणि अल्लाहच्या प्रेरणेने मुस्लिम दलित सदृश जीवनावर टाकलेला माझा हा पणतीचा प्रकाश.

'जितराब' आणि 'हवेली' या दोन कथासंग्रहाच्या अनुषंगाने मुस्लिम दलित जीवनाच्या बदलत्या वृत्ती-प्रवृत्ती, व्यथा, वेदना तून निर्माण झालेला ताणतणाव तसेच माणसाचे अंतरंग समजून घेण्याचा प्रयत्न केला आहे.

निखळ संशोधनाच्या भूमिकेतून व मुस्लिम दलित जीवन व त्यांच्या लेखणीतील विशेष समजून घेण्यासाठी हे कथासंग्रह अभ्यासनीय वाटले व हा विषय निवडल्यामुळे आनंद झाला. मार्गदर्शकांनीही उत्तम मार्गदर्शनाने तो सजविला. वास्तविक प्रस्तुत अभ्यासविषयीची निवड करण्यापासून ते प्रबंधिकेला पूर्णत्व प्राप्त करून देण्यापर्यंत माझे मार्गदर्शक आदरणीय गुरूवर्य डॉ. कन्हैया कुंदप, माजी प्रपाठक व मराठी विभाग प्रमुख, स.गा.म. कॉलेज, कराड यांनी जे बहुमोल मार्गदर्शन केले प्रबंधिका पूर्ततेसाठी प्रेरणा दिली त्यांचे आभार मानणे हे माझे आद्य कर्तव्य आहे.

ही प्रबंधिका पूर्णत्वास नेताना सतत प्रेरणा देणारे माझे आई वडिल तसेच माझे पती, सासरे, शेखसाहेब, सासर आणि माहेरच्या व्यक्ती, स.गा.म.कॉलेजचे मराठी विभागाचे सर्व प्राध्यापक, डॉ. सुमन पाटील मॅडम, प्रबंधिकेसाठी आवश्यक अशी संदर्भ पुस्तके मिळवून देण्यासाठी स.गा.म. कॉलेज, कराड, कराड नगरपालिका वाचनालय ग्रंथपाल, सातारा नगरवाचनालयाच्या कोडगुले मॅडम यांचेही आभार. शेवटी प्रबंधिकेची छपाई व बांधणी वेळेत पूर्ण करून देणाऱ्या सौ. ज्योती नांदेडकर, कराड यांचेही मी आभार मानते.

मुल्ला यास्मीन रमजान